**महाराष्ट्र शासन,**
**वित्त विभाग,**
शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३.
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ८ फेब्रुवारी, २०१२.

पहा : १) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. ६.५.२०११.
२) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.२४.८.२०११.
३) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि.९.९.२०११.
४) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. १३.९.२०११.
५) वि.वि. शासन परिपत्रक क्र. अंदाज-२०.११/प्र.क्र.९३/२०११/अर्थसंकल्प-३, दि. २१.९.२०११.

## परिपत्रक

२०११-१२ या वर्षाच्या अर्थसंकल्पित तरतुदी ७५% मर्यादेत विभागांना वितरणासाठी उपलब्ध आहेत. याशिवाय वेतन, सहाय्यक अनुदान वेतन, प्रवास खर्च, दूरध्वनी खर्च व भाडेपट्टी व कर यासाठीच्या १००% तरतुदी विभागांना दि.२१ जानेवारी,२०१२ रोजीचे परिपत्रकान्वये वितरित केलेल्या आहेत. आर्थिक वर्षाचे अखेरचा कालावधी विचारात घेता, दि.२१.१.२०१२ चे परिपत्रकाव्यतिरिक्त उर्वरित योजना व योजनेतर बाबींचा ८५% मर्यादेपर्यंतचा निधी विभागांना अर्थसंकल्पीय अंदाज, वाटप आणि संनियंत्रण प्रणाली (प्रत्यक्ष पध्दती) (अर्थसंकल्प वितरण प्रणाली) वर उपलब्ध करुन देण्याची बाब विचाराधीन होती.

२. सदर विनंतीच्या अनुषंगाने एकंदर तरतूदीच्या ८५% पर्यंतचा उर्वरीत निधी BDS वर उपलब्ध करुन देण्यात येत आहे. तथापि खालील प्रकरणामध्ये निधी आहरीत करताना वित्त विभागाची पूर्व अनुमती आवश्यक असेल.

अ) ३१ सहाय्यक अनुदाने
ब) ३२ अंशदाने
क) ३३ अर्थसहाय्य
ड) ५३, मोठी बांधकामे - निधी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ठेव म्हणून ठेवावयाचे प्रस्तावित केले असल्यास, अशा प्रकरणी.
ई) केंद्राचा निधी प्राप्त झाल्याशिवाय आहरीत करता येणार नाहीत, अशा केंद्रीय अर्थसहाय्य/अनुदानाशी निगडीत तरतुदी.

३. याविषयीच्या तरतुदी वित्त विभागाचे सहमतीदर्शक अनौपचारिक संदर्भाचा उल्लेख करुन वितरित कराव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( सु. प्र. कानडे )**
सह सचिव, वित्त विभाग.

(कृ.मा.प.)

D:\Chakole\G.R.2012.lwp\13

प्रति,

सर्व सह / उप सचिव, अर्थसंकल्प शाखा, सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र (VLC Section) मुंबई (२५ प्रती)
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र (VLC Section) नागपूर (५ प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा )-१, महाराष्ट्र, मुंबई (१५ प्रती)
महालेखापाल (लेखापरीक्षा )-२, महाराष्ट्र, नागपूर (५ प्रती)
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (४० प्रती)
संचालक, लेखा व कोषागार, मुंबई (५ प्रती)
निवासी लेखा अधिकारी, मुंबई (५ प्रती)
कार्यासन प्रशासन-४, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
वित्त विभागातील सर्व सह सचिव, उप सचिव, अवर सचिव, विशेष कार्य अधिकारी,
वित्त विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती, अर्थसंकल्प-३.

D:\Chakole\G.R.2012.lwp\14

विशेष